# प्रकरण तीन

## भविष्य निर्वाह निधी विभाग

**3.999 घर खरेदी व दुरुस्ती परतावा व ना परतावा अग्रिमाबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:- भविष्य निर्वाह निधी नियम 1998 च्या नियम 16 नुसार घर खरेदी व दुरुस्तीसाठी ना परतावा अग्रिम मंजूर करताना या विभागातील टिप- 2 नुसार स्थानिक नगरपालिकेने यथोचित मान्य केलेला नकाशा सादर केल्यानंतर खंड (ब) उपखंड 1-4, 5 व 6 नुसार मंजूरी देता येईल असे असताना 59 कर्मचाऱ्यांचे घर दुरुस्ती ना परतावा अग्रिम मंजूर करताना स्थानिक नगरपरिषदेचा मान्य नकाशा सादर न करता ना परतावा अग्रिम मंजूर केले आहे.

तसेच टिप- 5 नुसार घेतलेले अग्रिम ज्या कारणासाठी घेतले, त्याच कारणासाठी वापरण्याचे तीन महिन्यात कळविले पाहिजे. परंतू, तशी कार्यवाही केलेली नाही.

**3.1000 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतनाची (DCPS) सन 2016-2017 अखेर येणे असलेली शासन हिस्स्याची व व्याजाची रक्कम मागणी करणेबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** जिल्हा परिषद, पालघर भविष्य निर्वाह निधी विभाग, सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात सन 2016-2017 अखेर परिभाषित अंशदान निवृत्ती वेतनाची (DCPS) शासन हिस्सा वर्गणीची एकूण रक्कम रूपये 1,10,38,164/- व कर्मचारी व्याजाची एकूण रक्कम रूपये 1,67,69,811/- अशी एकूण रक्कम रूपये 2,78,07,975/- शासनाकडून येणे असून सदर रक्कम शासनाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी पाठपुरावा करावा. येणे असलेली शासन हिस्स्याची व व्याजाची रक्कम प्राप्त झाल्याची लेखापरीक्षणाची खात्री करावी.

**3.1001 भविष्य निर्वाह निधी 2016-2017 एकूण रकमेबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 या वित्तीय वर्षाची सुरुवातीची शिल्लक वर्षभरात जमा मिळून एकूण जमा त्या पैकी खर्च वजा उरलेली अखेर शिल्लक रूपये 2,52,35,83,202/- आहे व त्यामध्ये महालेखाकार यांचे पत्र क्रमांक 741 दिनांक 18/01/2017 रूपये 22,84,55,070/- एवढे व्याज 2015-2016 चे जोडलेले आहे. सदरचे व्याज डे बुकात दिनांक 18/01/2017 ला जमा करणेत आलेले आहे. परंतू, सदर पत्रातील मजकूरानुसार व्याजाचे वार्षिक समायोजन त्यांचे कार्यालयातील आकडयाबरोबर जुळत नाही. जुळवून देण्याची मागणी केली असता तसे केल्याचे आढळून येत नाही. तरी व्याजाचे आकडे जिल्हा परिषद स्तर व महालेखाकार (कोषागार) यांचेशी जुळवून दाखवावे.

2) कोषागारातील सन 2016-2017 ची सुरुवातीची शिल्लक वर्षभरात जिल्हा परिषदेकडून भरणा व प्राप्त व्याज मिळून एकूण जमा आणि त्यातून जिल्हा परिषदेकडून नोंदविलेला खर्च वजा जाता अखेर शिल्लक अशा प्रकारे मेळ घेवून भविष्य निर्वाह निधी विभागाने ठेवलेला नाही. लेखापरिक्षण पूर्ण नसल्याने व्याजाचे किंवा जमा रकमेबाबत नोंद न झाल्याने नुकसान झाले, हे नाकारता येत नाही. तरी प्राप्त आकडयानुसार 5 कोटींहून अधिक रकमेची तफावत असल्याचे भासते तरी कोषागारातील लेख्याशी वार्षिक शिल्लकीसह जुळवून दाखवावा. मात्र वर्षभरात जमा व वर्षभरात खर्च व त्यातून शिल्लक असा कोषागाराशी मेळ घेणे या कार्यवाहीस लेखा परिपूर्ण आहे, असे म्हणता येणार नाही.

**3.1002 खाते बंद झाले असताना खात्यात शिल्लक रक्कमेवर व्याज अदा केलेबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात श्री. पोपट सोनु चव्हाण ग्रामसेवक मे 2013 मध्ये सेवा निवृत्त झाले आहे. त्यांचे अंतिम प्रदान रक्कम रूपये 1,81,455/- चे प्रदान माहे एप्रिल 14 ला करण्यात आले असुन खाते बंद करण्यात आले आहे. तथापि, बृहतपत्रक 89 चे लेखापरीक्षण करीत असतांना सदर ग्रामसेवकाचे खात्यात रक्कम जमा दर्शविण्यात येवुन त्यावर व्याजाचे प्रदान करण्यात आले आहे.

उपरोक्त प्रमाणे सन 2014-2015 नंतर सदर खाते बंद करणे आवश्यक असतांना तसे न केल्याने सदर कर्मचा-याचे खात्यात सन 2016-2017 अखेर पावेतो जमा रक्कम व त्यावर व्याज अदा केल्याचे बृहतपत्रकात दर्शविण्यात येत आहे. ही गंभीर प्रकारची अनियमीतता असुन अशा प्रकारे सदर कर्मचाऱ्याला भविष्यात त्याचे भविष्य निर्वाह निधी खाते रक्कम जमा दर्शविण्यात येत असल्याने सदर रक्कम पुनःश्च अदा केली जावु शकते. तरी सदर जमा रककमेबाबत योग्य तो खुलासा सादर करावा व सदर खाते त्वरीत बंद करावे.

**3.1003 व्याजाचे अतिप्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद नाशिक, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद, नाशिक भविष्य निर्वाह निधी विभागाकडील सन 2016-2017 चे लेखा पंचायत समिती, सुरगाणा व पंचायत समिती, निफाड अंतिम अदाईगी प्रकरणांची पडताळणी केली असता व्याजाची परिगणना करतांना व्याजाचे अतिप्रदान झालेले आहे. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, राजपत्र दिनांक 10/06/2016 अन्वये एप्रिल 16 ते 8 सप्टेंबर 2016 करिता 8.1 टक्के व वित्त विभाग अधिसुचना दिनांक 13/10/2016 अन्वये 8 टक्के व्याज दर ठरविण्यात आलेला आहे. सदर कालावधी अंतिम अदाईगी प्रकरणात 8.7 टक्के व 8.1 टक्के व्याज दर अदा केलेला आहे. त्यामुळे जादा व्याज प्रदान झालेले आहे. पंचायत समिती, सुरगाणा एकूण 4 प्रकरणात रक्कम रूपये 2,245/- ज्यादा व्याज प्रदान झालेले आहे. ज्यादा प्रदान व्याज रक्कम रूपये 14,629/- संबंधिताकडुन वसुल करुन लेखापरीक्षास अनुपालन दर्शवावे.

**3.1004 अंतिम प्रदाने अदा करतांना जादा व्याज प्रदान केलेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2016-2017 या वित्तीय वर्षात नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त् झालेले कर्मचारी त्यांचे भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांकांची पडताळणी केली असता सदर कर्मचाऱ्यांना अंतिम प्रदान रक्कमांवर विहित व्याज दरापेक्षा जादा दराने व्याजाचे प्रदान झालेले आहे.

35 कर्मचाऱ्यांना अंतिम प्रदान रक्कमेत व्याजापोटी रुपये 26,519/- जादा प्रदान झालेले असून संबंधितांकडून सदरची रक्कम वसूल करुन शासन सदरी भरणा करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

**3.1005 सन 2016-2017 च्या दैनिक बुक व बृहतपत्रकातील सुरुवातीच्या व अखरे शिल्लकेच्या रक्कमेत व मासिक जमा व खर्चाच्या रक्कममध्ये तफावत असणे व कोषागाराशी ताळमेळ न घेणेबाबत.**

**जिल्हा परिषद नंदूरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** भविष्य निर्वाह निधीचे सन 2016-2017 च्या लेखापरिक्षणात विभागाची दैनिक बुक व बृहतपत्रकांच्या नोंदवहयाची तपसाणीत परिशिष्ठ क्रमांक च्या तपशिलानुसार सुरुवातीच्या व अखेरच्या शिल्लकेत तफावती आढळुन आली तसेच मासिक जमा व खर्चात कमी / जादा खर्चाची तफावत आढळुन आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सोबत जोडलेल्या परिशिष्ठातील तपशिलाप्रमाणे सुरुवातीच्या व अखेर शिल्लकेतील व मासिक जमा खर्चाच्या तफावतीचा शोध / ताळमेळ दैनिक बुक व बृहतपत्रकाशी घेण्यात येऊन रक्कमा अंतिम असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याकडुन प्रमाणित करण्यात याव्यात.

2) वित्तीय वर्षाचा कोषागाराशी ताळमेळ घेतल्याबाबतचे अभिलेख्याची अर्धसमास पत्र क्रमांक 1 व 2 अन्वये मागणी केली असता सदर ताळमेळ घेण्याबाबत जिल्हा कोषागार कार्यालयास पत्रव्यवहार केलेला असुन सदरचा कोषागाराने ताळमेळ घेतल्याबाबतचा पत्रव्यवहार जिल्हा परिषदेस केलेला नाही. तरी सदरचा ताळमेळ घेण्यात यावा. ताळमेळा अंति रक्कमा अंतिम करण्यात याव्यात.

**3.1006 भविष्य निर्वाह निधी डे बुक मधील शिल्लक रकमा व कोषागार कार्यालयातील व महालेखाकार, मुंबई यांचे लेख्याशी ताळमेळ न घेणेबाबत**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखासंहीता नियम 1968 चे नियम 223-224 नुसार भविष्य निर्वाह निधीचे लेखे डे बुक नमुना क्रमांक 87 लेहर क्रमांक 88 बॉडशीट नमुना क्रमांक 89 मध्ये जिल्हा परिषदेमध्ये ठेवण्याबाबत आदेश आहेत. महाराष्ट्र कोषागार नियम 1968 चे नियम 528 मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक संकिर्ण 1008/प्र.क्र.68/कोषा प्र 5/ क, दिनांक 30/03/2009 डे बुक मधील दिनांक 31/03/2017 अखेरची शिल्लक रक्कमेचा कोषागार व महालेखाकार, मुंबई यांचे लेख्याशी (8336 नागरी ठेवी जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी) चा ताळमेळ घेण्याची तरतुद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

दिनांक 31/03/2017 अखेरची शिल्लक रक्कम रूपये 3,73,45,27,017/- सदर रकमेचा कोषागार व महालेखाकार, मुंबई यांचे लेख्यांशी ताळमेळ घेतलेला नाही.

**3.1007 महालेखाकार कार्यालयाकडील जादा व्याजाच्या रक्कमांचे समायोजन परत करणेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** लेखापरीक्षण कालावधीत रूपये 2,049/- व्याज व प्रदाने जिल्हा परिषद कर्मचा-यांसाठी व्याजाचे रक्कमाचे समायोजन प्रधान महालेखाकार, मुंबई, यांनी सन 2015-2016 या विततीय वर्षासाठी भविष्य निर्वाह निधीच्या शिल्लकेवरील व्याजाच्या परताव्यासाठी पत्र क्रमांक जमा/8336/सी/ऊी/ ब्याज/2015-16 /82, दिनांक 09/02/2017 नुसार रक्कम रुपये 54,93,65,397/- एवढया रक्कमेचे समायोजन केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रंमाक बीजीटी- 2016/प्र.क्रं18/ वित्त-1, दिनांक 29/03/2016 चे वितरण आदेश अंतिम सुधारीत अनदान 2015-2016 नुसार रूपये 40,35,95,000/- वितरीत केलेले आहे.

2) जिल्हा परिषद, वित्त विभागाचे पत्र क्रमांक अर्थ/कार्या-/भ.नि.नि./432/2016 दिनांक 17/05/2016 नुसार सन 2015-2016 करीता व्याजाच्या परताव्यासाठी रक्कम रूपये 48,54,38,741/- एवढी मागणी केलेली आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रंमाक विनियो-2017 /प्र.क्रं23 / वित्त-1, दिनांक 30/01/2017 नुसार भविष्य निर्वाह निधीवरील व्याज योजनेकरीता ससन 2015-2016 या आर्थिक वर्षाकरीता महालेखापाल कार्यालय, मुबंई यांचेकडुन जादा पुस्तकी समायोजनाची तरतुद झालेली आहे. शासन निर्णयान्वये वितरीत केलेल्या तरतुदीपेक्षा झालेल्या जादा समायोजनाची रक्कम रुपये 14,57,70,397/- त्वरीत महालेखाकार कार्यालयाकडे परत करणेत यावी व ताळमेळ घ्यावा.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रंमाक विनियो-2017/प्र.क्रं23 / वित्त-1, दिनांक 23/02/2017 चे तातडीचे स्मरणपत्रानुसार कार्यवाही करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

**3.1008 नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याचे लेखे लेखापरीक्षणासं उपलबध न झालेबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-अंनियो-007/सं.क्रं.1152/प्रं.क्रं.181/आसथा-11, दिनांक 12/09/,2007 अन्वये परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागु करण्यांबाबत आदेश निर्गमीत केलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अर्धसमास पत्र क्रमांक 07 दिनांक 20/11/2017 अन्वये मागणी करुन देखील वरील 4 ते 7 विहित नमुनेतील नोंदवहया लेखापरीक्षणांस उपलबध करणेत आलेल्या नाहीत. सबब याबाबत सत्यता व अचुकता लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही.

2) या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक 25 नुसार मेळजुळणीबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे दरमहा अंशदान वसुलीचा ताळमेळ कोषागार अधिकारी यांचेकडुन करुन घेतील. यानुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी दरमहा प्रत्यक्षात वेतन देयकातुन जमा झालेल्या जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या अंशदानाची रक्कम व जिल्हा परिषदेच्या सममुल्य अंशदानाची रक्कम याची चलने एकत्रित जतन करुन ठेवावीत व कर्मचा-यांच्या परिभाषीत अंशदानाची निवृत्तीवेतन लेख्यांत कर्मचा-यांच्या अंशदानाच्या व जिल्हा परिषदेचे सममुल्य अंशदानाच्या रक्कमेचा हिशोब ठेवावा व लेख्यांच्या जमा व खर्चाचा नियतकालीक मेळजुळणी करण्यांची जबाबदारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची राहील.

3) मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जिल्हा परिषदेचे कर्मचा-यांच्या अंशदानाची तसेच शासनाच्या / जिल्हा परिषदेच्या सममुल्य अंशदानाची रक्कम शासनास भरणा केल्याचा अहवाल नमुना आर-7 मध्ये भरुन, दरमहा चलनाच्या प्रतीसह कोषागार कार्यालय, अहमदनगर यांचेकडे पाठवावा व त्या संदर्भातील प्रमाणपत्र कोषागार अधिकारी, अहमदनगर यांचेकडुन प्राप्त करुन घ्यावे. मात्र अशी कार्यवाही केलेली आढळुन आली नाही.

**3.1009 परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 16) -** भविष्य निर्वाह निधी, जिल्हा परीषद, सांगली चे सन 2016-2017 चे लेखापरिक्षण करताना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या अभिलेख्याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 20 दिनांक 25/01/2018 नुसार निर्गमित केले होते. तथापि, सदर अर्धसमास पत्रास अनुपालन प्राप्त झाले नसलेने सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजने संदर्भातील लेजर (खतावणी नोंदवही) व बृहतपत्रक (ब्रॉडशिट) जत, विटा, वाळवा व शिराळा तसेच मुख्यालयाकडील कर्मचा-यांचे नोंदी घेतलेल्या नाहीत. सदरच्या नोंदी घेवुन ब्रॉडशिट पुर्ण करुन लेखापरीक्षणास सादर करावे.

2) परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजने संदर्भातील लेजर (खतावणी नोंदवही) मध्ये मुख्यालय तसेच तालुकास्तरावरील कर्मचा-यांचे नोंदी घेतलेल्या नाहीत. सदरच्या नोंदी घेवुन लेजर पुर्ण करुन लेखापरीक्षणास सादर करावे.

3) सन 2016-2017 च्या रोजकिर्दीप्रमाणे अखेरची शिल्लक रक्कम रुपये 28,21,62,413/- असुन बृहतपत्रकाचा वार्षिक गोषवारा काढुन रोजकिर्दीतील शिल्लक व बृहतपत्रक गोषवाऱ्याची शिल्लक तसेच कोषागाराकडील दिनांक 31/03/2017 अखेरची शिल्लक याचा मेळ घेण्यात आलेली नाही. सदरचा मेळ घेवुन विवरणपत्र लेखापरीक्षणास सादर करावे.

**3.1010 ना परतावा अग्रीम रक्कम कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी खात्यातुन वजा न करता अंतीम प्रदान केलेमुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री.पाटील यांना सन 2015-2016 मध्ये प्रमाणक क्रमांक 48 दिनांक 23/06/2015 मंजूर रक्कम रूपये 4,90,000/- इतके अग्रीम मंजूर करुन प्रदान केले आहे. सदर रक्कम अंतीम प्रदान करतांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधी लेख्यातुन वजा करुन प्रदान करणे आवश्यक असतांना ती कमी न केलेमुळे रक्कम रुपये 4,90,000/- चा आर्थिक गैरव्यवहार झालेला आहे.

2) श्री. पाटील यांना अंतीम प्रदान करतांना माहे डिसेंबर पर्यंत व्याजाचे प्रदान केले आहे. सदर व्याज प्रदान करतांना त्यांच्या माहे नोव्हेंबर 2016 पर्यतची वर्गणीची चढती बेरीज रक्कम रूपये 72,66,588/- इतके नमुद करुन त्यावर 8.1 टक्के या व्याजदराने रक्कम रुपये 49,049/- प्रदान केले आहे. शासन परीपत्रक क्रमांक भविष्य निर्वाह निधी-1089/ प्रक्र199/89/13अ, दिनांक 11/06/1991 आणि ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र पीईएन 1094/सीआर46/ 17, दिनांक 18/04/1994 मधील तरतुदीनुसार भविष्य निर्वाह निधीची अंतीम रक्कम नियत दिनांकास अदा करणेकरीता विहीत कार्यपध्दती विहीत केली आहे. त्यानुसार विहीत समय मर्यादेत विहीत केलेले

फॉर्म भरून घेणेची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची असुन त्यांचेकडूनही नियमांचे पालन झालेने नाही त्यामुळे विंलबांस जबाबदार असणाऱ्या संबधीतांविरुध्द शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे

3) श्री. पाटील यांनी भविष्य निर्वाह निधीमधून अंतीम रक्कम काढणेसाठी विहीत नमुना " ब " हा दिनांक 03/09/2016 रोजी भरुन दिलेला असलेमूळे महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 36 (3) टिप 5 मधील नियम 28 (4) मध्ये तरतूद केल्यानुसार अंतीम जमा रक्कम काढण्याचा अर्ज कार्यालय प्रमुखाकडुन वर्गणीदाराकडे आल्यानंतर या नियमात विहीत केलेल्या कालमर्यादेत त्यावर कृती करण्यात कसुर केल्यास त्या नियमांतील नियम 12 मध्ये तरतुद केल्यानुसार व्याज मिळण्याचा त्याला हकक असणार नाही, अशी तरतुद असुन श्री. पाटील यांनी विहीत समयमर्यादेत मागणी अर्ज सादर केलेला नसलेमुळे त्यांना माहे ऑगस्ट 2016 ते नोंव्हेबर 2016 पर्यंतचे अदा केलेले व्याज अनुज्ञेय ठरत नाही. सबब रक्कम रुपये अग्रीम रक्कम रूपये 4,90,000/- अधिक अतिप्रदान व्याज 14,446/- असे एकुण अतिप्रदान रक्कम रुपये 5,04,446/- ही महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी नियत 1998 मधील नियम 12 (8) मधील तरतुदीनुसार 2.5 टक्के दंडनीय व्याज आकारुन 8 टक्के भविष्य निर्वाह निधीवरील व्याज अधिक 2.5 टक्के अशा 10.5 टक्के या दराने व्याज रक्कम रुपये 52,967/- याप्रमाणे एकुण रक्कम रुपये 5,42,967/- अक्षरी अतिप्रदान रुपये पाच लाख बेचाळीस हजार नऊशे सदुसष्ठ इतकी रक्कम एक रक्कमी वसुल करुन अनुपालन सादर करणेबाबत सुचीत केले होते त्यानुसार लेखापरीक्षणात आक्षेप घेतलेनंतर श्री. पाटील यांचेकडुन अदा करणेत आलेले अग्रीम रक्कम रुपये 4,90,000/- इतकी दिनांक 20/01/2018 रोजीच्या चलनाने वसुल केले आहे. तथापि, उर्वरीत रक्कम रुपये 52,967/- इतकी वसुल करुन अनुपालन सादर करणेत यावे.

4) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 मधील नियम 230 नुसार प्रत्येक खातेदाराला 31 मार्च रोजी त्याच्या खाती शिल्लक असलेली पुर्वीची जमा त्या वर्षामध्ये काढलेले अग्रीम तसेच त्या वर्षामधे जमा झालेली वर्गणी व त्यावरील व्याज दर्शविणारी त्याच्या हिशेबाचे विवरणपत्र (लेखाचिठठी) माहे जूनअखेरपर्यत देणेची तरतुद असून श्री. पाटील हे दिनांक 31/07/2016 रोजी सेवानिवृत्त झाले असतांना सन 2015-2016 रोजीची लेखाचिठठीची अंतीम शिल्लक न घेता सन 2014-2015 या वर्षाची घेवुन प्रदान केले आहे.

अंतीम प्रदान करणेसाठीचा प्रस्ताव सादर करतांना कर्मचाऱ्यांने घेतलेले अग्रीमाबाबत संबधीत आहरण व संवितरण अधिकारी यांनी चुकीची माहिती दिलेमुळे आणि कर्मचारी निवृत्त झालेनंतर कर्मचाऱ्यांने अग्रीम घेतले आहे किंवा कसे, याबाबतची खातरजमा करुनच अंतीम रक्कमेचे प्रदान होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे सदरची रक्कम नियमबाहयारित्या लेख्याबाहेर राहिल्याने शासन हानी झाली आहे. तरी सदरच्या रक्कमा संबधीतांकडुन व्याजासह वसुल करुन शासनखाती जमा करुन अनुपालन सादर करणेत यावे.

**3.1011 नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना अभिलेख मधील उणीवा.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 18) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षक कर्मचारी वगळता शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची सममूल्य अंशदान रक्कम वर्गणी जमा करणेकरीता शासनाकडून जिल्हा परिषदेस अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान रक्कम जिल्हा परिषदेने 8342- इतर ठेवी,117- शासकीय कर्मचारी परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजना या लेखाशीर्षाखाली समायोजित केली आहे. कर्मचारी अंशदान वर्गणी रक्कम रूपये 4,40,08,148/- इतकी जमा झाली असताना शासन हिस्स्याची सममूल्य अंशदान रक्कम रूपये 5,30,00,000/- इतकी समायोजन केले आहे. शासनाची रक्कम रूपये 89,91,852/- इतकी जादा रक्कम समायोजित केली आहे. त्यामुळे शासनाची रक्कम रूपये 89,91,852/- नाहक अडकून पडली आहे.

2) योजनेंतर्गत कर्मचाऱ्याकडून वसूल केलेले निवृत्ती वेतन अंशदान रकमेची दैनिक नोंदवही नमुना आर4 प्रमाणे 2016-2017 मध्ये जमा कर्मचारी अंशदान शासन सममूल्य हिस्सा व त्यावर प्राप्त व्याज याची एकूण एकंदर बेरीज रक्कम रूपये 9,70,08,148/- इतकी आहे. सदर रक्कम या कालावधीत जमा कर्मचारी वर्गणी रक्कम रूपये 44,00,818/- शासन सममूल्य हिस्सा रक्कम रूपये 28,00,000/- व त्यावरील व्याज जमा रक्कम रूपये

2,50,00,000/- अशी एकूण रक्कम रूपये 53,00,000/- इतकी असणे आवश्यक असताना त्यामध्ये रक्कम रूपये 89,91,852/- इतकी तफावत आहे. तफावत रकमेचा मेळ घेणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 49 प्रमाणे अंशदान वर्गणीचे धनादेश तात्काळ बँक खाती भरणा करणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजनेची मासिक वर्गणीचे जिल्हा परिषद वित्त विभागास प्राप्त धनादेश शासन खाती जमा केलेबाबत अभीलेखे अपुर्ण उपलब्ध करणेत आले आहेत.

4) परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना निधीची दैनिक पुस्तक प्रमाणे वर्षअखेर शिल्लक व 8342- इतर ठेवी, 117- शासकीय कर्मचारी परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजना या लेखाशीर्षाखाली कोषागार खाती शिल्लक रक्कम याचा उपरोक्त शासन निर्णयाचा परिच्छेद 21 मध्ये नमूद केल्याप्रमाणे आर-7 नमुन्यात मेळ घेण्यात आलेला नाही.

5) कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून दरमहा जमा झालेल्या अंशदानाची रक्कम व जिल्हा परिषदेने जमा केलेल्या सममूल्य अंशदानाची रक्कम 8342- इतर ठेवी, 117-शासकीय कर्मचारी परिभाषित अंशदान निवृतीवेतन योजना या लेखाशीर्षाखाली शासन खाती कोषागारात जमा करणेची असून त्याचा मासिक मेळ घेणेकरीता कोषागार कार्यालयास पत्र सादर केले आहे. तथापि, कोषागार कार्यालयाकडुन मेळ घेतलेबाबतचे प्रमाणपत्र घेतलेले नाही. तरी कोषागार कार्यालयाकडुन मेळ घेवुन पुर्तता करणेत यावी.

6) ग्रामविकास विभागाच्या शासन निर्णयात सूचित केल्याप्रमाणे मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या सदर योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यास निवृत्ती लेखाक्रमांक देणे आवश्यक आहे दिनांक 31/03/2017 शिक्षक व शिक्षकेत्तर अशा एकूण कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन लेखाक्रमांक देवुन कर्मचाऱ्यांना तपशील नोंदवहीत एकत्रित बांधणी करून जतन केलेला नाही.

7) सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद 16 मध्ये नमूद केल्याप्रमाणे दिनांक 01/11/2005 नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची माहे डिसेंबर 2010 पर्यंतच्या कालावधीतील अंशदान थकबाकी माहे जानेवारीच्या वेतन देयकापासून प्रत्येक महिन्यात उलट्या क्रमाने वसूल करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत तथापि, सदर योजनेचे अभिलेख लेखापरीक्षणासाठी सादर न केलेने अशी मागील अंशदान थकबाकीबरोबर वसूल झाली असल्याची तपासणी करता आली नाही.

8) योजनेंतर्गत असलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या अंशदान एवढी अनुरूप रक्कम शासनाकडून जिल्हा परिषदेस प्राप्त न झाल्याने ती शासन खाती जमा झालेली नाही. त्यामुळे योजनेंतर्गत नोंदणीकृत शिक्षक कर्मचाऱ्यांच्या खाती जमा अंशदानवरील देय व्याजाची जिल्हा परिषदेने परिगणना केलेली नाही. तसेच बऱ्याच अंशी शिक्षक कर्मचाऱ्यांची मासिक अंशदानाची रक्कम संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या वेतानांतून वसूल केलेली नाही ही बाब गंभीर आहे.

9) ग्रामविकास विभागाच्या दिनांक 21/05/2010 च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन निधी योजनेखालील कर्मचाऱ्यांची लेखा नोंदवही नमुना क्रमांक आर-5 व योजनांतर्गत कर्मचारी खाते निहाय जमा होणारी रक्कम याबाबतचा तपशील दर्शवणारी नोंदवही आर-6 मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

10) योजनांतर्गत लाभार्थी कर्मचाऱ्यांच्या लेख्याची वार्षिक हिशेब चिठ्ठी नमुना आर-3 तयार केलेल्या असून त्या वित्त विभागातील लेखाधिकारी यांनी साक्षांकित केलेल्या नाहीत. तसेच सदर वार्षिक हिशेब चिठ्ठी वर्षनिहाय सन 2016-2017 पासून वितरीत केल्या असल्याबाबतच्या पोच लेखापरीक्षणास सादर केलेल्या नाहीत.

11) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो-1007/प्र.क्र.181/आस्था-11 दिनांक 21/05/2010 नियम 21 मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे दरमहा अंशदान वसुलीचे ताळमेळ कोषागार अधिकारी यांचेकडुन घेतील जिल्हा परीषद कर्मचारी अंशदानाची रकक्कम व जिल्हा परीषदेच्या सममुल्य अंशदानाची रक्कम यांची चलने एकत्रीत उपलब्ध झाली नाहीत. सबब सदरची चलने एकत्रित लावलेली नसलेमुळे जिल्हा परीषद कर्मचारी अंशदान व शासन अनुदान यांची मेळजुळणी करता आलेली नाही.

**3.1012 सर्व भविष्य निर्वाह निधी खाते व्याजाची आकारणी चुकीच्या पध्दतीने केल्याने जादा व्याज प्रदान झालेबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** सन 2016-2017 च्या लेखापरिक्षणांवेळी भविष्य निर्वाह निधी खातेचे लेखे तपासले असतां कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी खाते व शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधी खाते व्याज आकारणी चुकीच्या पध्दतीने केल्याने जादा व्याज प्रदान झाले आहे. सन 2016-17 या वित्तीय वर्षासाठी भविष्य निर्वाह निधी खाते व्याज पहिल्या 6 महिन्याचे (एप्रिल 2016 ते सप्टेंबर 2016) कालावधीकरिता 8.1 टक्के तर दुसऱ्या सहा महिनेच्या (ऑक्टोबर 2016 ते मार्च 2017 ) कालावधीकरिता 8.0 टक्के दराने आकारणी करावयाचे आहे. पहिल्या सहा महिन्यांकरीता व दुसऱ्या सहा महिन्याकरीता वेगवेगळे दर असल्याने या दोन्ही सहा महिन्यांकरीता वेगवेगळी सरासरी काढून व्याज प्रदान करणे आवश्यक आहे. असे न करता भविष्य निर्वाह निधी विभागाने व्याजाची आकारणी करतांना वर्षभरासाठी एकच सरासरी काढून पहिल्या सहा महिन्यांकरिता 8.1 टक्के व तसेच दुसऱ्या सहा महिन्यांकरिता 8 टक्के व्याज प्रदान केले आहे. विभागाने अशा चुकीच्या पध्दतीने व्याज प्रदान केल्याने प्रत्येक खात्याला जादा व्याज प्रदान झाले आहे. जादा जमा केलेले व्याज वसूल करावे.

**3.1013 जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी खाते शिल्लक व कोषागार कार्यालयाच्या शिल्लक रकमेतील तफावतीबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2016-2017 च्या लेखापरिक्षणांवेळी भविष्य निर्वाह निधी विभागाचे अखेरची शिल्लक व कोषागार विभागाकडील शिल्लक तपासणी केली असतां, त्यात मोठया प्रमाणात तफावत असल्याचे दिसून आले.

उपरोक्त प्रमाणे कोषागार कार्यालयाचे आरंभीची शिल्लक जमा, व्याज परतावे व अखेरची शिल्लक याबाबत विवरणपत्र सादर करावे.

**3.1014 भविष्य निर्वाह निधी 2016-2017 चा मुख्य लेखाशिर्ष 8336 च्या ताळमेळाबाबत व प्राप्त व्याजाबाबत अनियमितता.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** भविष्य निर्वाह निधी 2016-2017 चा मुख्य लेखाशिर्ष 8336 च्या ताळमेळाबाबत व प्राप्त व्याजाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद, भविष्य निर्वाह निधी शाखा यांनी सन 2016-2017 च्या जमा रकमेबाबत त्यांचे पत्र क्रमांक अजिप/वित्त/साभनिनि/3747/2017, दिनांक 05/09/2017 नुसार कोषागारास पत्र दिले असून कोषागाराकडून ताळमेळ प्रमाणपत्र अदयाप अप्राप्त आहे. कोषागारासोबत पाठपुरावा करुन सन 2016-2017 चा ताळमेळ घेण्यांत यावा.

**3.1015 भविष्य निर्वाह निधी वर्गणीची कपात नियमितपणे न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** जिल्हा परिषद, भविष्य निर्वाह निधी विभाग 2016-2017 चे लेखापरीक्षणामध्ये निवड महिन्यातील नमुना नंबर 88 ची तपासणी केली असता 5 कर्मचाऱ्यांनी भविष्य निर्वाह निधी खात्यातील वर्गणीची वसुली नियमितपणे झाल्याचे आढळून आले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 8(ब) अन्वये वेतनातुन करण्यात येणारी भविष्य निर्वाह निधी वर्गणीची कपात ही वित्तलब्धीच्या 6 टक्के पेक्षा कमी नसावी. नियमानुसार कर्मचाऱ्यांच्या पगारातून भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीची रक्कम नियमितपणे कपात करून भविष्य निर्वाह निधीमध्ये वर्ग करणे आवश्यक आहे. नमुद कर्मचाऱ्यांनी पगारातून भविष्य निर्वाह निधी वर्गणीच्या रक्कमेची नियमितपणे वसुली होवून भविष्य निर्वाह खाती भरणे आवश्यक आहे. परंतु नमुद कर्मचाऱ्यांच्या खात्यातून वर्गणीची कपात नियमितपणे झाल्याचे आढळून येत नाही. अनिमिततेबाबत स्पष्टीकरण करण्यात यावे.

**3.1016 भविष्य निर्वाह निधी लेखा मध्ये 6वा वेतन आयोगाचे हप्त्यावर चुकीची पध्दती लावून व्याजाची गणना करून कर्मचाऱ्यांच्या खात्यात व्याजाची रक्कम जादा जमा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** भविष्य निर्वाह निधी विभाग सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात विभागाने उपलब्ध केलेल्या अभिलेख्यांची व दैनिक पुस्तक नमुना 88 ची पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

कर्मचाऱ्यांना 6 वा वेतन आयोगाचा 5 वा हप्ता माहे जुन 2013 मध्ये देय झाला असुन सदरचा हप्ता कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी लेख्यात जिल्हा परिषद विभागाव्दारे सन 2015 व 2016 मध्ये वेगवेगळया महिन्यात जमा करण्यात आल्याचे निर्देशनास आले. सदरचा हप्ता जमा करतांना त्यांच्या खाती जुन 2013 पासून ते सन 2015 व 2016 पर्यंत 20, 25, 30 महिन्यांचे व्याज जमा करण्यात आले. परंतु, सदर व्याजाची रक्कमेची गणना करतांना वार्षिक व्याजाची गणनाचा सुत्र लागु करण्यात आल्यामुळे त्यांच्या खाती व्याजाची जादा रक्कम जमा करण्यात आल्याचे निर्देशनास आले.

व्याजाची रक्कम आकारणी करून जादा व्याज रक्कम रूपये 29,034/- प्रदान केल्याचे लेखापरिक्षणास निदर्शनास आले. सदर रक्कमेतील कर्मचाऱ्यांचे नाव उदाहरण दाखल असून याचप्रमाणे प्रत्येक कर्मचा-यांच्या खात्यावर 6 वा वेतन आयोगाचे 4 था व 5 वा हप्त्यावर जादा व्याज जमा करण्यात आले असून सदर जादा रक्कमेची वसुली होणे आवश्यक असून व याप्रमाणे सर्व कर्मचाऱ्यांना प्रदान केलेले जादा व्याज वसूल करून अनुपालन दर्शवावे.

**3.1017 PHC संग्रामपुर अंतर्गत कार्यरत असलेल्या DCPS च्या कर्मचाऱ्यांची कपात केलेल्या रक्कमांचे चलान व विवरणपत्र भनिनि विभागास सादर न केल्याबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

PHC संग्रामपुर मध्ये एकूण 4 कर्मचारी DCPS धारक आहेत. परंतु, DCPS शासन निर्णयानुसार दिनांक 01/11/2005 पासून सुरु करण्यात आले असून कर्मचाऱ्यांचे मुळ वेतन + ग्रेड वेतन + महागाई भत्ता यांच्या 10 टकके रक्कम कर्मचाऱ्यांकडून कपात करुन त्याच्या वसुल केलेल्या रक्कमेइतकी रक्कम शासनाकडून अनुदान प्राप्त करुन सबंधीत DCPS कर्मचाऱ्यांच्या खाती जमा करणे आवश्यक असतांना PHC संग्रामपुर यांनी DCPS कर्मचाऱ्यांचे DCPS रक्कमा वसुल करुन चलानसोबत कर्मचाऱ्यांची यादीसह भविष्य निर्वाह निधी विभागाकडे सादर करणे आवश्यक होते. परंतु, प्राथमिक आरोग्य केंद्रं, संग्रामपुर यांनी माहे नाव्हेंबर 2005 पासुन ते अदयाप 31/03/2017 पर्यंत चलान व विवरण सादर केलेले नाही. कर्मचाऱ्यास वार्षिक हिशोब लेखा कर्मचाऱ्यास दिलेला नाही. PHC संग्रामपुर यांनी भविष्य निर्वाह निधी खात्यास DCPS चा वसुल केलेला हिशोब न दर्शविणे ही, बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असून कर्मचाऱ्याचे व्याजाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही

**3.1018 भविष्य निर्वाह निधी बृहतपत्रकाचा एकत्रित गोषवारा सन 2015-2016 व सन 2016-2017 चा एकत्रित गोषवारा यातील अखेर शिल्लक व सुरवातीच्या शिल्लकेतील तफावतीबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** भविष्य निर्वाह निधी विभाग, जिल्हा परिषद, वर्धा सन 2016-2017 चे लेखापरीक्षण वेळी बृहतपत्रकेतील शिल्लकेची तपासणी केली असता सन 2015-2016 ची अखेर शिल्लक रक्कम रुपये 23,41,16,099/- असतांना सन 2016-2017 ची सुरवातीची शिल्लक रक्कम रुपये 2,26,04,17,779/- घेतली असल्याने सन 2016-2017 ची सुरुवातीची शिल्लक रक्कम रुपये 8,07,43,214/- ने कमी घेतलेली असल्याचे दिसुन आले. तरी तफावत रक्कम रुपये 8,07,43,214/- चा बोध झालेला नाही. सबब परिपुर्ण माहितीसह योग्य ती शिल्लक कायम होणे आवश्यक आहे. तशी तफावत रक्कमेबाबत जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

**3.1019 कोषागार व महालेखापाल कार्यालय सोबत आर्थिक व्यवहाराच्या ताळमेळाबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषदेने भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा रक्कम परतावा - नापरतावा अग्रीम व खातेधारकांना द्यावयाच्या व्याजाबाबतच्या रक्कमांचा ताळमेळ कोषागार व महालेखाकार यांच्याकडील लेख्याशी करणे आवश्यक असतांना तसा ताळमेळ केल्याचे दिसुन आले नाही.

त्यामुळे लेख्यातील रक्कमांचे वर्गीकरण व्यवस्थीत झाले नसल्याची शक्यता नाकारता येत नाही. व्याजाचे समायोजन योग्य प्रकारे न झाल्याने देय व्याज व प्रत्यक्षात खात्यात वर्ग करण्यात आलेल्या व्याजाच्या रक्कमेशी ताळमेळ करता येत नाही.

जिल्हा परिषदेने भविष्य निर्वाह निधीचे नमुना 89 अपुर्ण ठेवला असल्याने व्याजाची परीगणना, समायोजन अचुक झाले असुन प्रत्येक वर्षाच्या अंतीम शिल्लका ह्या कोषागार / महालेखाकार यांचेकडील खात्यानुसार शिल्लकेशी जुळत असल्याची खात्री करता आली नाही.

**3.1020 व्याजाची परिगणना न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात विभागाने लेखे अद्यावत ठेवल्याचे दिसून आले नाही. अंतिम सुधारित अनुदान 2016-2017 भविष्य निर्वाह निधीवरील व्याज लेखाशीर्ष (20490771) अन्वये शासन निर्णय क्रमांक बीजीटी-2017/प्र.क्र.8/वित्त-1, दिनांक 25/03/2017 नुसार प्राप्त वितरण आदेश सामायोज्य अनुदान तसेच सादर केलेल्या ताळमेळ पत्रकात रुपये 1,501,85,000/- सन 2016-2017 चे प्राप्त व्याज दर्शविण्यात आले. प्रत्यक्षात भविष्य निर्वाह निधी खातेधारकांचे खातेनोंदवह्यांची तपासणी केली असता सन 2016-2017 या वर्षातील प्राप्त वर्गणी, उचल याबाबत नोंदी परिपूर्ण केलेल्या नसून लेखे बंद करून त्यावर व्याजाची परिगणना केलेली नाही. त्यामुळे ताळमेळ पत्रकातील दर्शविलेले व्याज बरोबर आहे असे लेखापरीक्षणास म्हणता येत नाही.

**3.1021 विलंबाने चलानव्दारे डिसीपीएस व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी कपातीच्या रक्कमा लेख्यात जमा केल्यामुळे कर्मचारी वर्गाचे होणारे व्याजाचे नुकसानाबाबत**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणाचे वेळी बरेच कर्मचारी वर्गाचे वेतनातुन कपातीचे चालान विलंवाने कधी कधी 2 ते 3 महिन्याचे एकत्रीत जिल्हा परीषदेच्या वित्त विभागाकडे प्राप्त झाले असल्यामुळे अशा कपातीच्या रक्कमा वित्त विभागास मिळालेल्या महिन्यात जमेस घेण्यात आल्यात. अशा प्रकरणी कर्मचारी वर्गाची कोणतीही चुक नसल्यामुळे व्याज परीगणनेकरीता प्रोगेसिव्ह बेरीज कमी येते व त्याचे व्याजाचे नुकसान होते यामुळे प्रत्येक कर्मचारी वर्गाची दरमाहा कपात झाली किंवा कसे, याचा बोध घेणे त्रासाचे व कठीण जाते. तसेच निवृत्तीपुर्वीच्या 3 महिन्यात कपात बंद केली किंवा कसे, हे स्पष्ट होत नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विलंबाने कपातीच्या रक्कमा लेख्यात जमा होणे यामध्ये कर्मचारी वर्गाची चुक नसल्यामुळे होणारे कर्मचारी वर्गाच्या व्याजाच्या नुकसानाची जबाबदारी संबंधिती DDO / जबाबदार अधिकारी वर्गावर निर्धारीत करणे आवश्यक आहे किंवा जिल्हा परीषदेने ती स्विकारणे आवश्यक आहे.

2) दरमहा कर्मचारी वेतन होणे व कपातीचे शेडयुल व चलान वित्त विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे दरमहा वेतन कपातीच्या रक्कमा संबंधिताचे लेख्यात जमा होईल, याची वित्त विभागाने दक्षता घेणे आवश्यक आहे.

**3.1022 ठेव संलग्न विमा प्रदान करणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2016-2017 जिल्हा परिषद, जालना चे भविष्य निर्वाह निधी विभागाचे लेखापरीक्षणात वित्तीय वर्षात मयत कर्मचा-यांना महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 मधील नियम 30 अन्वये ठेव संलग्न

विमा योजना लागु करण्यात आलेली आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, आदेश क्रमांक भनिनि/1004/प्र.क्र.01/ आस्था-11, दिनांक 23/04/2004 अन्वये सदर योजनेची कमाल मर्यादा रुपये 60,000/- इतकी करुन अटी व शर्ती देण्यात आलेल्या आहे व विभागाने एकूण लाभार्थ्यांना रक्कम रुपये 16,43,674/- वितरीत करण्यात आली आहे. सदरील रक्कमेची शासनाकडुन मागणी करुन अनुपालन दर्शवावे.

**3.1023 नमुना नंबर 79 व 89 लेखा परीक्षणास उपलब्ध न केले बाबत**

**जिल्हा परिषद बीड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

**बृहतपत्रक नमुना नंबर 89 बाबत :-** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायतसमित्या लेखा संहिता 1968 चे नियम 234 नुसार प्रत्येक महिन्याच्या अखेरीपुर्वी वर्गण्यांचे परतावे व इतर बाबी खातेनोंदवही वरुन नमुना 89 मधील बृहतपत्रकांमध्ये नोंदवण्यात येतील आणि महिन्याच्या एकुण जमा व काढलेल्या रकमा, दैनिक वहीतील नोंदीशी जुळवण्यात येतील. नमुना नंबर 89 वरुन वर्षाच्या अखेरीस बृहतपत्रकातील स्तंभांची बेरीज करुन अर्जित व्याजाची गणना करणे आवश्यक आहे. परंतु 2004-2005 पासुन बृहतपत्रकच तयार केलेले नसल्यामुळे व्याजाची गणना कशी केली याचा खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच कर्मचारी निहाय व महिना निहाय जमा नोंदीतच त्या वरील व्याजाची योग्य असल्याची खात्री करता आलेली नाही.

**अग्रिम नोंदवही नमुना नंबर 79 बाबत :-** महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968 चे नियम 237 नुसार भविष्य निर्वाह निधीतुन दिलेल्या आगाऊ रकमांची नोंद करण्यासाठी नमुना 79 मध्ये नोंद ठेवण्यात येईल. आगाऊ रक्कम मंजुर करण्यात व देण्यात आल्या वर लगेच त्या बदल्या नोंदवहीत नोंद घेण्यात येईल आणि जसजशी परतफेड होईल तसतशा नोंदी यात घेण्यात येतील परंतु वित्त विभागाने ही नोंदवहीच ठेवलेली नाही. त्यामुळे दिलेल्या आगाऊ रक्कमा व त्याची परतफेडयाची सुयोग्य पडताळणी करता आलेली नाही. सदर नोंदवहया बाबत दरवर्षीच्या लेखापरीक्षणां मध्ये आक्षेप असताना या बाबत कोणती ही कार्यवाही या विभागाकडुन करण्यात आलेली नाही.

**3.1024 जिल्हा परीषदेचे स्वउत्पन्नातून निर्माण केलेल्या कर्मचारी यांचे वेतन व भत्त्याची अदाई होणाऱ्या कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधीचे लेखे वेगळे न ठेवलेबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** भविष्य निर्वाह निधी, जिल्हा परिषद, हिंगोली चे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून निर्माण केलेले उदाहरण हातपंप कर्मचारी अंतर्गत कर्मचाऱ्याचे भविष्य निर्वाह निधीचे अभिलेखे तपासले असता त्यांचे वेगळे लेखे ठेवण्यात आलेले नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा विभाग व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्रमांक आपना 3307/ प्र.क्र. 26/ पा.पु.15, दिनांक 07/04/2008 व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक वेतन-2012/ प्र.क्र.109/ आस्था 10, दिनांक 04/06/2012 अन्वये जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून निर्माण केलेले उदाहरण हातपंप कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व निवृत्ती वेतन याची जबाबदारी जिल्हा परिषद यांची असल्याचे शासन परिपत्रकात व निर्णयात नमूद केले. त्यामुळे त्यांचे वेगळे लेखे ठेवणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) भविष्य निर्वाह निधी, जिल्हा परिषद विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार जिल्हा परिषद हिंगोलीकडे दिनांक 31/03/2016 अखेर एकूण 6338 भविष्य निर्वाह निधी चे खातेदार कर्मचारी असून यामध्ये जिल्हा परिषदचे स्वउत्पन्नातून वेतन व भत्ते घेणारे कर्मचारी यांची संख्या दर्शविलेली नाही.

3) भविष्य निर्वाह निधी जिल्हा परिषद हिंगोलीने सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात सर्वच कर्मचाऱ्याचे कपातीची रक्कम एकाच खात्यावर जमा करण्यात आली आहे. त्यामधूनच परतावा ना-परतावा व व्याज इत्यादी दाव्यांची अदाई होत असल्याचे दिसते.

4) जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून वेतन अदा होणारा कर्मचारी यांना अंदाजपत्रकामध्ये तरतूद करुन स्वतंत्र खाती उघडून त्यामधून वेतन व भत्ते व सेवा विषयक लाभ अदाई करणे आवश्यक होते. अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5) या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम 1998 चे नियमान्वये शासकीय योजनेचे वर्गणीदार करता येत नाही. कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी ची वर्गणी जमा व आहरण करण्याकरिता स्वतंत्र खाते उघडण्यात आले नाही. सदर कर्मचाऱ्याचे भविष्य निर्वाह निधी ची वर्गणी शासन खाती जमा केल्याचे आढळते.

6) जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून वेतन व भत्ते अदाई होणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी व त्यांची संख्या व त्यांचे भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक व वर्गणी व व्याज बाबत काय कार्यवाही करण्यात आली याबाबतचे अभिलेखे दर्शवावेत.

**3.1025 भविष्य निर्वाह निधी खात्यात रक्कम नसतानां उचल करणेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद, नांदेड भविष्य निर्वाह निधी सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात कर्मचा-याचे खात्यात रक्कम नसतांना रक्कम रूपये 21,082/- ची उचल केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संबधित कर्मचा-याच्या खात्यावर रक्कम शिल्लक नसतांना वजा रक्कम उचल करणे नियमबाह्य आहे. सदर रक्कमेवर प्रचलित व्याजदराने आकरणी करुन वसुल रक्कम शासनखाती जमा लेखाशिर्षात भरणा करणे आवश्यक आहे. वजा रक्कमेचे उचल केल्याचे उपरोक्त नोंदीवरुन दिसुन येते.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे 233 व 238 प्रमाणे वर्गणी दाराच्या वर्गणी व परतावा अग्रीमाच्या अनुसुचीत नोंदी बृहतपत्र व खाते नोंदवहीमध्ये योग्यरितीने नोंदविल्या असत्या तर अशा प्रकारे नियमबाह्यता झाली नसती.

3) महाराष्ट्र शासकीय वित्त विभाग परीपत्रक क्रमांक सै/1001/प्र.क्र.131/ कोषा -5, दिनांक 13/11/2002 अन्वये शासनाने वेळोवेळी भविष्य निर्वाह निधी लेख्यांचे मेळ घेण्याबाबत आदेश निर्गमीत केले असुन त्याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास कार्यालय प्रमुखास व्यक्तीशा जबाबदार धरण्याच्या सक्त सुचना दिलेल्या आहेत.

**3.1026 परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन लेखेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 14) -** भविष्य निर्वाह निधी विभाग, जिल्हा परिषद, नांदेड सन 2016-2017 लेखापरिक्षणात असे दिसुन आले की, भविष्य निर्वाह निधी विभागाने परिभाषेत अंशदान निवृत्ती वेतन अनुदान अपुर्ण ठेवले आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अ नि यो - 1005/128/ सेवा - 4, दिनांक 31/10/2005 अन्वये 01/11/2005 रोजी किंवा त्यानंतर सेवेत नियुक्त होणारे अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी नवीन परिभाषीत अशंदान निवृत्ती वेतन योजना अंमलात आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो - 1007/ प्र.क्र. 181/ आधारे, दिनांक 21/05/2010 अन्वये जिल्हापरिषद कर्मचा-यासाठी सदर योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही नमुद केली आहे. त्यानुसार वर्ग 3 व 4 कर्मचा-याचे सदर योजनेचे अभिलेखे देखभालाची मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची जबाबदारी आहे.

2) तथापि, जिल्हा परिषदेने सदर योजना लागु असणा-या कर्मचारी व शिक्षकाचे नमूना नंबर आर - 4, नमूना नंबर आर - 5, नमूना नंबर आर - 6 हे अभिलेखे अपुर्ण ठेवले आहेत. त्यामुळे परिभाषेत अंशदान निवृत्ती वेतन लेख्यातील शिल्लक रक्कमेची तपासणी करता आली नाही. सदर लेखे अपुर्ण असल्याने रक्कमेचे अफ़रातफ़र होणेबाबत शक्यता नाकारता येत नाही. सदर लेखे अपुर्ण ठेवणे गंभीर बाब असुन संबंधित जबाबदारावर योग्य ती कार्यवाही करुन लेखे पुर्ण करुन आक्षेपाचे अनुपालन दर्शवावे

**3.1027 भविष्य निर्वाह निधीतील रक्कमावर जिल्हा परिषदेने दिलेले व्याज व शासनाकडून प्राप्त व्याजात तफावत असले बाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. भविष्य निर्वाह निधी जिल्हा परिषद,लातूर सन 2016-2017 या वित्तीय वर्षातील भविष्य निर्वाह निधीचे लेखा परीक्षणात असे आढळून आले की सन 2016-2017 च्या ब्रह्तपत्रात दर्शविलेल्या खातेदाराना व्याज दिलेले आहे व शासनाकडून प्राप्त व्याज यात तफावत आहे.

तफावत पाहता जिल्हा परिषद लातूर भविष्य निर्वाह निधी विभागाने शासनाकडून मोघम व्याजाची रक्कम मागणी केल्याचे दिसून येते. याबाबत सुरुवातीपासून ताळमेळ घेवून अनुज्ञेय रकमेपेक्षा कमी/जास्त प्राप्त व्याजाच्या रकमेचा वर्ष निहाय तपशील दर्शवून व्याजा पोटी जादा रक्कम शासनाकडून मागणी करून घेण्याबाबत पाठपुरावा करावा व त्याबाबतचे अनुपालन दर्शवावे.